# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES**

म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक - ४२२ ००४

Mhasrul, Dindori Road, Nashik – 422 004.

**Phone:** 0253-2539175 / **EPABX:** 0253-2539100 - 300 / **Fax:** 0253-2539176

**E-mail:** pro@muhsnashik.com / **Web:** www.muhsnashik.com


क्रं.मआविवि/पीआर/१२७२/२००९ वृत्त प्रसिध्दीसाठी दि. ३१ ऑगस्ट २००९

## केंद्र शासनाच्या नियोजन आयोगाकडून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठास रुपये १२.६ कोटींचे अर्थसहाय्य.

**नाशिक दि. ३१ :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने संशोधन क्षेत्रात करीत असलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन आरोग्य विज्ञान क्षेत्रातील शिक्षकांसाठी अद्ययावत उच्च व दर्जेदार अशी अत्याधुनिक शिक्षक प्रशिक्षणासाठी केंद्र शासनाच्या नियोजन आयोगाने रुपये १२.६० कोटीचे अर्थसहाय्य मंजूर केले असल्याची माहिती कुलगुरु मा.डॉ.मृदुला फडके यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देताना कुलगुरु डॉ. मृदुला फडके म्हणाल्या की, आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे संशोधन क्षेत्रात विविध पाऊले उचलली आहेत. याचाच एक भाग म्हणून विद्यापीठातर्फे पुणे येथे आरोग्य विज्ञान क्षेत्रातील शिक्षकांसाठी शिक्षण प्रशिक्षण संस्था सुरु करण्यात आली आहे व यासारख्या इतर योजना सुरळीतपणे कार्यान्वित करणेकरीता विद्यापीठातर्फे केंद्र शासनाच्या नियोजन आयोगाकडे अर्थसहाय्य मागितले होते. संपूर्ण योजनेवर नियोजन आयोगाने अभ्यास करुन याची दखल घेतली व हे अर्थसहाय्य देणेकरीता महाराष्ट्र शासनाला सुचित करण्यात आले.

त्या पुढे म्हणाल्या की, याबाबत महाराष्ट्र शासनाने सदर अर्थसहाय्य विधी मंडळाच्या अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे सादर करण्यात आले. विधान मंडळाने यांस मंजुरी देऊन सदर अर्थसहाय्यास मंजुरी देण्यात आली होती. यासंबंधी दि. २९ ऑगस्ट २००९ रोजी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातर्फे अध्यादेश पारित करण्यात आला आहे, असेही त्यांनी सांगितले.

नोव्हेंबर २००८ मध्ये सर्व कुलगुरुंच्या बैठकीत विद्यापीठांचे कुलपती महाराष्ट्राचे राज्यपाल महामहिम मा.श्री.एस.सी. जमीर यांनी शिक्षकांना अद्ययावत प्रशिक्षण देण्याबाबत अधिक प्रयत्न करण्यात यावे असे आवाहन केले होते. यानुसार आरोग्य विद्यापीठातर्फे कुलगुरु मा.डॉ. मृदुला फडके व प्राध्यापक संचालिका डॉ. निलिमा क्षीरसागर यांनी हा प्रस्ताव तयार केला. पुणे केंद्राचे डॉ.बुलाख, डॉ. शेरे, डॉ. पायल बन्सल, यांनी याकामी सहकार्य केले.

महामहिम राज्यपालांनी या प्रस्तावास स्वत:ची मान्यता देऊन नियोजन आयोगाकडे याची शिफारस केली. वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाचे मंत्री मा.ना.श्री.राजेश टोपे, अर्थमंत्री मा.ना. दिलीप वळसे पाटील, तसेच वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव मा.श्री. भूषण गगराणी यांनी या प्रस्तावाबाबत वैयक्तीक लक्ष घातले. नियोजन मंडळाचे तत्कालीन सदस्य मा.डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी तातडीने पावले उचलून सदर प्रस्तावास मंजुरी मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

सदर प्रशिक्षण केंद्राद्वारे चार स्तरीय प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. यात पहिल्या स्तरावर नवीन डॉक्टर्स तसेच शिक्षकांना प्रशिक्षीत केले जाईल. यात संवाद व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञान आदींबाबत प्रशिक्षण दिले जाणार आहे. दुसऱ्या स्तरावर थोडया अनुभवी डॉक्टर्स व शिक्षकांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येईल. यात वैद्यकीय क्षेत्रातील अद्ययावत गोष्टींची माहिती देण्यात येईल. तिसऱ्या स्तरावर प्राध्यापक व ज्येष्ठ शिक्षकांसाठी कन्टीन्युअस मेडिकल एज्युकेशन (CME) व कन्टीन्युअस प्रोफेशनल डेव्हलमेंट (CPD) यासारख्या प्रशिक्षणांचे आयोजन केले जाणार आहे. यात विशेष कौशल्य विकसनावर भर दिला जाणार आहे. चौथ्या स्तरावरील प्रशिक्षणात प्राचार्य, अधिष्ठाता, व्यवस्थापक यांना प्रशिक्षण दिले जाणार असून यात विशिष्ट प्रशासकीय बाबी, संशोधन प्रस्ताव आदींबाबत प्रशिक्षीत करण्यात येणार आहे.

विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. सुनिल फुगारे यांनी सांगितले की, या अध्यादेशानुसार रुपये १२.६० कोटींपैकी नाशिक येथे इमारत व मुलभूत सुविधा उभारण्याकरिता पाच कोटी रुपये, पुणे येथे इमारत बांधणी व देखभालीकरीता तीन कोटी रुपये, व्हिडीओ कॉन्फरसिंगकरिता एक कोटी रुपये, ग्रंथालयात वैद्यकीय क्षेत्राशी संबंधीत पुस्तके घेण्याकरिता एक कोटी रुपये, कॉन्सरशिअम ऑफ जर्नल्सकरिता एक कोटी रुपये, इतर साहित्य खरेदी करणेकरिता १.६ कोटी रुपये मंजुर करण्यात आले आहेत.

**प्र. कुलसचिव**